# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्यविद्यापीठ)

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली

आ.जा./क्र./741/२०२६ दि. २१/१०/२०२६

**प्रति,**

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख,
गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:– महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्याबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर विभाग यांच्या वतीने महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त राज्यातील विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांतील शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा पदवी (UG) व पदव्युत्तर (PG) अशा दोन स्वतंत्र गटांमध्ये आयोजित करण्यात आलेले असून सदर स्पर्धेसाठी नोंदणी संकेतस्थळ : https://dbaspratishthan.org.in हे असून **नोंदणीची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर २०२६** ही आहे.

तरी, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित आपल्या महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना सदर निबंध स्पर्धेबाबत माहिती देऊन त्यांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच सदर स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी व्हावी यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक सुचना देण्यात याव्यात.

महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समता, शिक्षण, बंधुता व सामाजिक न्यायविषयक विचारांचा प्रसार करण्याच्या दृष्टीने ही स्पर्धा महत्वपूर्ण आहे. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करून या उपक्रमास सहकार्य करावे.

सदर बाबीस प्राधान्य देऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, ही विनंती.

**संलग्न :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर यांचे पत्र.

Bansagade

**प्रमुख**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
प्र-कुलगुरु कार्यालय
आवक क्र.3125 दि.13.10.26
जावक क्र.3118 दि.13.10.26


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा सार्वजनिक उपक्रम)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, २ रा माळा ए-विंग, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर, दीक्षा भूमी रोड, नागपूर - ४४० ०२२
CIN : U74999MH2017NPL297149

दुरध्वनी क्रं. ०७१२-२९८१९९१ ई-मेल आयडी-mahadessay100@gmail.com


जा. क्र.डॉं.बा.आं.स.प्र.नाग./ कार्यक्रम/ निबंध स्पर्धेचे / आस्था/ 401 /2026-27 दि. 05/ 10 /2026

प्रति,

मा.कुलगुरु,
गोंडवाना विद्यापीठ,
एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स,
गडचिरोली - ४४२ ६०५,

**विषय : महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह शताब्दी वर्ष व महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष निमित्त राज्यातील सर्व विद्यापीठांतर्गत (कृषी, पशु व मत्स्य आणि आरोग्य विद्यापीठ वगळून) महाविद्यालयात निबंध स्पर्धेत मोठ्याप्रमाणात विद्यार्थी सहभागी होणेबाबत ...**

**संदर्भ** :-१. या कार्यालयाचे पत्र क्र. २४१ दिनांक १०/०७/२०२६
२.या कार्यालयाचे पत्र क्र.२८५ दिनांक १९/०८/२०२६
३.या कार्यालयाचे पत्र क्र.३३१ दिनांक ०२/०९/२०२६

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र.1 व 3 अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान,नागपूर विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये राज्यातील सर्व विद्यापीठांतर्गत (कृषी, पशु व मत्स्य विज्ञान आणि आरोग्य विद्यापीठ वगळून) महाविद्यालयांमधिल विद्यार्थ्यांकरीता **"महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह शताब्दी वर्ष व महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा "**आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर स्पर्धा पदवी (UG) व पदव्युत्तर (PG) अशा दोन स्वतंत्र गटांमध्ये आयोजित केल्या जाणार आहेत. स्पर्धा यशस्वी होण्याच्या दृष्टिने आपल्या स्तरावरुन विद्यापीठ स्तरीय ' समन्वय अधिकारी (Nodal Officer)' नियुक्त करणे व संदर्भीय पत्रासह पाठविलेल्या सुचनापत्रकानुसार सर्व संबंधित महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होईल याकरीता व कालबध्द कार्यक्रमानुसार माहे,ऑगस्ट,2026 पर्यंत अधिनस्थ महाविद्यालयांशी समन्वय साधून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग व्हावा यासाठी आपल्या विद्यापीठाचे स्तरावर महाविद्यालयांशी संपर्क व समन्वय साधण्यासाठी ' समन्वय अधिकारी (Nodal Officer)' नेमणूक करुन सहकार्य करावे व ऑनलाइन नोंदणी पोर्टल संकेतस्थळ -https://dbaspratishthan.in वर दिनांक 31 ऑक्टोबर,2026 पर्यंत नोंदणी करण्याकरीता विनंती करण्यात आली होती.

कृ.मा.प.